# राष्ट्रीय आरोग्य अभियान
# जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, रायगड पदभरती जाहीरात

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेली पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने दि.२९/०६/२०२४ रोजी पर्यंतच्या कालावधीसाठी खाली नमूद केलेल्या अटी व शर्ती च्या अधीन राहून पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यानुसार रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे -

⟹ **दर महिन्याच्या १५ व ३० तारखेला अर्ज मागवून भरणेत येणारी पदे :-**

| अ. क्र | पदाचे नाव | कार्यक्रम | रिक्त पदे | रिक्त पदे | आरक्षणानुसार जात प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी (MBBS / BAMS Medical Officer) | हिंदुहृदय सम्राट आपला दवाखाना / १५ वा वित्त आयोग कार्यक्रम | २३ | १) आपला दवाखाना माणगाव<br>२) आपला दवाखाना पेण<br>३) आपला दवाखाना श्रीवर्धन<br>४) आपला दवाखाना उरण<br>५) नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र बोरीपाखाडी उरण<br>६) नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र लक्ष्मीनगर खोपोली<br>———<br>रायगड जिल्हयामध्ये नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रामधील एकुण - १७ पदे | तात्पुरत्या स्वरुपात | M.B.B.S. with MCIM Registration<br>Or<br>B.A.M.S. with MCIM Registration | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्षे | M.B.B.S. अर्हता धारक उमेदवारांस रु. ६०,०००/- प्रतिमाह मानधन<br>तसेच<br>B.A.M.S. अर्हता धारक उमेदवारांस रु. २५,०००/- प्रतिमाह मानधन व दरमहा केलेल्या कामानुसार कमाल रु. १५,०००/- कामावर आधारित मोबदला |

Scanned with CamScanner

| अ. क्र | पदाचे नाव | कार्यक्रम | रिक्त पदे | रिक्त पदे | आरक्षणानुसार जात प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | Entomologist | BPHU | *10 | १) BPHU पेण, ता.पेण<br>२) BPHU महाड, ता. महाड<br>३) BPHU पोलादपूर, ता. पोलादपूर<br>४) BPHU श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन<br>५) BPHU मुरुड, ता. मुरुड<br>६) BPHU रोहा, ता.रोहा<br>७) BPHU कर्जत, ता. कर्जत<br>८) BPHU उरण, ता. उरण<br>९) BPHU म्हसळा, ता. म्हसळा | तात्पुरत्या स्वरुपात | M.Sc. Zoology with 5 years' experience | खुला ३८ व राखीव ४३ (NHM) कार्यरत कर्मचारी ५ वर्ष शिथिल | रु. ४००००/- |
| ३ | Public Health Specialist | BPHU | *10 | १) BPHU पेण, ता.पेण<br>२) BPHU महाड, ता. महाड<br>३) BPHU पोलादपूर, ता. पोलादपूर<br>४) BPHU श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन<br>५) BPHU मुरुड, ता. मुरुड<br>६) BPHU रोहा, ता.रोहा<br>७) BPHU कर्जत, ता. कर्जत<br>८) BPHU उरण, ता. उरण<br>९) BPHU म्हसळा, ता. म्हसळा | तात्पुरत्या स्वरुपात | Any Medical Graduate with MPH/MHA / MBA in HealthCare Management | खुला ३८ व राखीव ४३ (NHM) कार्यरत कर्मचारी ५ वर्ष शिथिल | रु. ३५०००/- |
| ४ | Hospital Manager | IPHS | १ | राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा रुग्णालय अलिबाग | तात्पुरत्या स्वरुपात | Any Medical Graduate with MPH/MHA /MBA in Health care Management | खुला ३८ व राखीव ४३ (NHM) कार्यरत कर्मचारी ५ वर्ष शिथिल | रु. ३५०००/- |
| ५ | District Quality Assuarance | Quality Assuara | १ | राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय (जिल्हा आरोग्य | तात्पुरत्या स्वरुपात | Any Medical Graduate | खुला ३८ व राखीव ४३ | रु. ३५०००/ |

Scanned with CamScanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Coordinator | nce | | अधिकारीस्तर), जिल्हा रुग्णालय अलिबाग | | with MPH/MHA /MBA in Health care Management | (NHM) कार्यरत कर्मचारी ५ वर्ष शिथिल | – |
| ६ | Ayush Consultant | Ayush | १ | राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय (जिल्हा आरोग्य अधिकारीस्तर), जिल्हा रुग्णालय अलिबाग | तात्पुरत्या स्वरुपात | Any Medical Graduate with MPH / MHA/MBA Health Care - with relevant programmatic experience | खुला ३८ व राखीव ४३ (NHM) कार्यरत कर्मचारी ५ वर्ष शिथिल | रु. ३५०००/– |
| ७ | District Epidemiologist | IDSP | १ | राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय (जिल्हा आरोग्य अधिकारीस्तर), जिल्हा रुग्णालय अलिबाग | तात्पुरत्या स्वरुपात | Any Medical Graduate with MPH/MHA /MBA in Health Care Management | खुला ३८ व राखीव ४३ (NHM) कार्यरत कर्मचारी ५ वर्ष शिथिल | रु. ३५०००/– |
| ८ | District Programme Coordinator | NTEP | १ | राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम कार्यालय, अलिबाग | तात्पुरत्या स्वरुपात | Any Medical Graduate with MPH/MHA /MBA in Health | खुला ३८ व राखीव ४३ (NHM) कार्यरत कर्मचारी ५ वर्ष शिथिल | रु. ३५०००/– |
| ९ | District Programme Coordinator | NPCDCS | १ | राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा रुग्णालय अलिबाग | तात्पुरत्या स्वरुपात | Any Medical Graduate with MPH/MHA /MBA in Health | खुला ३८ व राखीव ४३ (NHM) कार्यरत कर्मचारी ५ वर्ष शिथिल | रु. ३५०००/– |

टिप – वर नमुद केलेनुसार क्र.१ ते ९ अंतर्गत संबधित आरोग्य संस्थामधील आवश्यक सर्व पदे भरेपर्यंत दर महिन्याच्या १५ व ३० तारखेला (कार्यालयीन सुट्टी असल्यास पुढील कार्यालयीन दिवशी) इच्छूक

Scanned with CamScanner

उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यापैकी MBBS वैद्यकिय अधिकारी या पदासाठी दर महिन्याच्या १५ व ३० तारखेला (कार्यालयीन सुट्टी असल्यास पुढील कार्यालयीन दिवशी) इच्छूक उमेदवारांच्या थेट मुलाखती राष्ट्रीय आरोग्य अभियान (जिल्हा आरोग्य अधिकारीस्तर) कार्यालय, २ रा मजला, जिल्हा रुग्णालय अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे आयोजित केल्या जातील. उर्वरित पदे राज्यस्तरीय मार्गदर्शक सुचनांनुसार अर्ज मागवून गुणांकन पध्दतीने भरणेत येतील. याची सर्व इच्छूक उमेदवारांनी नोंद घ्यावी. वर नमुद क्र.१ या पदासाठी M.B.B.S. पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास राज्यस्तरीय मार्गदर्शक सुचनांनुसार B.A.M.S. पदवीधारक उमेदवाराचा विचार केला जाईल. तसेच B.A.M.S. पदवीधारक उमेदवाराच्या जागेवर M.B.B.S. पदवीधारक उमेदवार उपलब्ध झाल्यास B.A.M.S. पदवीधारक उमेदवाराच्या सेवा तात्काळ समाप्त करणेत येतील, याची नोंद घ्यावी.

⟹ दि. ०८/०८/२०२४ ते दि. २०/०८/२०२४ रोजीच्या कालावधीमध्ये अर्ज मागवून गुणांकन पध्दतीनुसार भरणेत येणारी पदे :-

| अ. क्र | पदाचे नाव | कार्यक्रम | रिक्त पदे | रिक्त पदे | आरक्षणानुसार जात प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अधिपरीचारिका (Staff Nurse) (महिला) | हिंदुहृदय सम्राट आपला दवाखाना / १५ वा वित्त आयोग कार्यक्रम | २२ | १) आपला दवाखाना भानवज बालवाडी, खोपोली<br>२) आपला दवाखाना महाड<br>३) आपला दवाखाना म्हसळा<br>४) आपला दवाखाना तळा<br>५) नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र शिळगांव खोपोली<br>६) नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र ज्येष्ठ नागरीक भवन, महाड<br>७) नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र दांडा कोळीवाडा, श्रीवर्धन | तात्पुरत्या स्वरुपात | B.Sc. Nursing/ GNM with Nursing Council Registration | रु. २०,०००/- प्रति माह |
| 2 | अधिपरीचारिका (Staff Nurse) (पुरुष) | | २ | रायगड जिल्हयामध्ये नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रामधील एकुण - १७ पदे | तात्पुरत्या स्वरुपात | | |

Scanned with CamScanner

| अ. क्र | पदाचे नाव | कार्यक्रम | रिक्त पदे | रिक्त पदे | आरक्षणानुसार जात प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | अधिपरीचारिका (Staff Nurse) (महिला) | SNCU/ NBSU- Non Tribal/ Suman/ L2 / L3 / KMC / NCD | ३४ | प्रा.आ.केंद्र / जिल्हा रुग्णालय / उपजिल्हा रुग्णालय / ग्रामीण रुग्णालय | तात्पुरत्या स्वरुपात | B.Sc. Nursing/ GNM with Nursing Council Registration | रु. २०,०००/- प्रति माह |
| 4 | अधिपरीचारिका (Staff Nurse) (पुरुष) | SNCU/ NBSU- Non Tribal/ Suman/ L2 / L3 / KMC / NCD | ८ | प्रा.आ.केंद्र / जिल्हा रुग्णालय / उपजिल्हा रुग्णालय / ग्रामीण रुग्णालय | तात्पुरत्या स्वरुपात | B.Sc. Nursing/ GNM with Nursing Council Registration | रु. २०,०००/- प्रति माह |
| 5 | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) | हिंदुहृदय सम्राट आपला दवाखाना / १५ वा वित्त आयोग कार्यक्रम | २७ | १) आपला दवाखाना भानवज बालवाडी, खोपोली<br>२) आपला दवाखाना म्हाडा पेण<br>३) आपला दवाखाना कोटनाका उरण<br>४) आपला दवाखाना तळा<br>५) नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र शिळगांव खोपोली<br>६) नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र ऊर्दुशाळा खोपोली<br>७) नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र ज्येष्ठ नागरीक भवन, महाड<br>८) नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र दांडा कोळीवाडा, श्रीवर्धन<br>९) नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र धनगर आळी रोहा<br>१०) नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र बोरीपाखाडी, उरण | तात्पुरत्या स्वरुपात | 12th pass in Science or equivalent course passed **AND** Paramedical Basic training Course **Or** Sanitary Inspector Course (Government Recognized Institute) | रु. १८,०००/- प्रति माह |

Scanned with CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ---------------<br>रायगड जिल्हयामध्ये नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रामधील एकुण - १७ पदे | | | |
| 6 | सांख्यिकी अन्वेषक (Statistical Investigator) | MIS | १ | राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय (जिल्हा शल्य चिकित्सकस्तर), जिल्हा रुग्णालय अलिबाग | तात्पुरत्या स्वरुपात | Any graduate with statistics | रु. १८०००/- |
| 7 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Lab Technician) | NTEP | ६ | १) नगरपालिका दवाखाना खोपोली<br>२) प्रा.आ.केंद्र बोर्लीमांडला,<br>३)प्रा.आ.केंद्र गडब,<br>४) प्रा.आ.केंद्र आंबेत<br>५) उपजिल्हा रुग्णालय पेण<br>६) एम.जी.एम. वैद्यकिय कॉलेज कामोठे | तात्पुरत्या स्वरुपात | **12th + Diploma**<br>**(महाराष्ट्र परावैद्यक परिषदेकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य )** | रु. १७,०००/- |
| 8 | Senior Treatment Supervisor (STS) | NTEP | १ | महानगरपालिका पनवेल | तात्पुरत्या स्वरुपात | 1. Bachelor's Degree And Recognized sanitary inspector's course<br><br>2. Certificate course in computer operation (minimum 2 months)<br><br>3. Permanent two wheeler driving license & should be able to drive two wheeler | रु. २०,०००/- |
| 9 | Tuberculosis Health Visitor (TBHV) | NTEP | २ | महानगरपालिका पनवेल | तात्पुरत्या स्वरुपात | 1. Graduate in science<br>OR<br><br>2. Intermediate (10+2) in science and experience of Working as MPW/ LHV/ANM/Health Worker/Certificate or higher course in Health Education/ Counselling<br><br>OR<br><br>3. Tuberculosis health visitor's recognized course<br><br>4. course in computer operations (minimum two months) | रु. १५,५००/- |

Scanned with CamScanner

| अ. क्र | पदाचे नाव | कार्यक्रम | रिक्त पदे | रिक्त पदे | आरक्षणानुसार जात प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | पॅरा मेडिकल वर्कर_(PMW) | NLEP | २ | १) तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय रोहा<br>२) तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय श्रीवर्धन | तात्पुरत्या स्वरुपात | 12th + PMW Certificate | रु. १७,०००/- |
| 11 | मलेरिया तांत्रिक सुपरवायझर (MTS) | NVBDCP | १ | १) तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय खालापूर | तात्पुरत्या स्वरुपात | Graduate with Biological Stream With 1 Year relevant Experience | रु. १५,५००/- |

अटी व शर्ती :-

१. सदर पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही. तसेच अर्जदाराला शासकीय सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दाबा करण्याचा अधिकार राहणार नाही.

२. राष्ट्रीय आरोग्य अभियान मधुन कोणत्याही संस्थास्तरावरुन एखादया कर्मचा-यांच्या अकार्यक्षमता / अनियमितेच्या कारणामुळे सेवा समाप्त करण्यात आल्या असतील तर त्या कर्मचाा-यास या पुढे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कोणत्याही पदाकरिता विचार केला जाणार नाही.

३. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा व अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झाला नसावा.

४. उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदांकरिता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशनचे नुतनीकरण प्रमाणपत्र / कौन्सिलचे रजिस्ट्रेशनसाठी अर्ज सादर केलेबाबतची पावती अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील तसेच कौन्सिलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालु कालावधीतील असावी. तथापि अवैध प्रमाणपत्र उमेदवारांना भरतीप्रक्रियेतुन अपात्र ठरविले जाईल.

५. निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजु होताना सादर करावा लागेल.

६. सविस्तर जाहिरात पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, निवड / प्रतिक्षा यादी व पदभरती प्रक्रियेबाबतची सर्व माहिती / सुचना http://www.zpraigad.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल याबाबत अर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार

Scanned with CamScanner

नाही. नियुक्ती आदेश देण्यापुर्वी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची सर्व मूळ कागदपत्र निवड समिती मार्फत पडताळणी करुन सादर करण्यात आलेली कागदपत्रे चुकीची आढळयास उमेदवारांना निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अटी व शर्ती खालील प्रमाणे -**

गुणांकन पध्दती :- वैद्यकिय अधिकारी (MBBS MO) या पदाव्यतिरिक्त इतर सर्व पदांकरिता गुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबविण्यात येणार आहे.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proportion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५० % प्रमाणे proportion ६०*५०/१००=३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे proportion काढावे. (उदा.१.Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करून अतिरिक्त B.Sc (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास M.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे proportion = ६०*२० /१०० = १२ गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |

१. शासकीय, निमशासकीय, खाजगी तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणा-या संबंधित अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल. ज्या पदाकरिता अर्ज केला आहे त्याच पदाचा असलेला अनुभव ग्राहय धरण्यात येईल.

२. वरिल सर्व पदे ही कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधन तत्वानुसार भरण्यात येणार असुन सदरील नियुक्ती आदेश हे निर्गमित केलेल्या तारखेपासुन ते दिनांक २९/०६/२०२५ पर्यंतच्या कालावधीकरिता भरण्यात येणार आहेत. पुढील पुनर्नियुक्ती आपल्या कामगिरी मुल्यांकनावर आधरित असेल.

३. अर्जदाराला सोयीनुसार पदस्थापनेचे ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

Scanned with CamScanner

४. निवड यादीतील गुणानुक्रमानुसार, सामाजिक आरक्षणानुसार प्राधान्यक्रमाने पदस्थापना केली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल. तसेच अशा उमेदवारांस पुढील सर्व भरती प्रक्रियेतून कायमचे बाद ठरविण्यात येईल.

५. उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदाकरिता तत्सम कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

६. सदर जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवरांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

७. केंद्र शासनाने संबंधित पदे नामंजुर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

८. उमेदवारांनी अर्ज करित असलेल्या पदाचे नाव व स्वतःच्या जातीचा प्रवर्ग अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावा. जर एकापेक्षा अधिक पदांकरिता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र अर्ज सादर करावेत. तसेच ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्याच पदासाठी अर्ज ग्राहय धरला जाईल. तसेच कार्यक्रमाचे नाव स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

९. अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचुक नोंदवावा. तसेच ते भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहतील याची दक्षता घ्यावी.

१०. ज्या उमेदवाराना ग्रेड सिस्टीम / CGPA नुसार गुण मिळालेले आहेत त्यांनी अंतिम वर्षाच्या गुणांची टक्केवारी तसेच त्यांच्या विद्यापीठानुसार टक्केवारी काढण्याचे सूत्र अर्जामध्ये नमुद करावे. सदर माहिती न दिल्यास गुण दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

११. दि.२३/०७/२०२२ च्या पत्रानुसार दोन पेक्षा अधिक हयात मुले असणा-या उमेदवारांचे अर्ज पात्र केले जाणार नाही. सोबत जोडण्यात आलेला नमुना भरुन अर्जासोबत जोडणे बंधनकराक राहील.

१२. राष्ट्रीय आरोग्य अभियान मार्गदर्शक सुचनेनुसार अर्ज करणा-या उमेदवारांनी यापुर्वी राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये काम केले असल्यास व त्याची अकार्यक्षमता / अनियमिततेच्या कारणामुळे सेवा समाप्त करण्यात आली असल्यास सदर पदभरतीकरीता अशा उमेदवाराचा विचार केला जाणार नाही.

**१३. राज्यस्तरावरुन आरक्षणाबाबत (बिंदूनामावलीबाबत) मार्गदर्शन प्राप्त झालेनंतर प्रमाणित केलेल्या पदनिहाय बिंदूनामावलीनुसार राखीव प्रवर्गाकरिता असलेल्या पदांकरिता राखीव प्रवर्गाचे**

Scanned with CamScanner

उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल व संबंधित उमेदवार प्राप्त झाल्यानंतर त्यांची नियुक्ती संपुष्टात येईल.

१४. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन ७ दिवसांमध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होणे बंधनकारक राहील अन्यथा त्याची नियुक्ती आदेश संपुष्टात आणुन प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

१५. भरती प्रक्रिया स्थगित करणे / रद्द करणे / पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष निवड समिती तथा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी राखुन ठेवले आहेत. याबाबत उमेदवारास कोणताही दावा करता येणार नाही.

१६. नियुक्ती आदेश स्वीकारताना उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक व इतर कागदपत्राच्या मुळप्रती पडताळणी करिता सादर करणे बंधनकारक राहील. मुळप्रती सादर न केल्यास सदर उमेदवारांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. याची नोंद घ्यावी.

१७. प्राप्त झालेल्या अर्जावरुन गुणांकनानुसार मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. सदर मेरीट लिस्ट जिल्हा परिषदेच्या http://www.zpraigad.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांना सदरबाबत आक्षेप असल्यास ते सादर करण्याकरिता ०२ दिवसाची मुदत देण्यात येईल. आक्षेपासोबत त्यांच्या पृष्ठयर्थ योग्य पुरावे सादर करण्यास सुचित करणेस येईल अशा प्रकारे प्राप्त आक्षेपांचे निराकरण करुन त्यानुसार अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल व ती रायगड जिल्हा परिषदेच्या या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१८. सदर भरती प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर प्रतिक्षा यादी प्रसिध्द केल्याच्या तारखेपासुन ०१ वर्षा पर्यंत वैध राहील.

१९. अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारिरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच शासकीय कर्मचारी यांच्यावर पुर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकीय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

२०. जाहिरातीमध्ये दर्शविल्याप्रमाणे नमुद पदाचे मानधन हे एकत्रित मासिक मानधन आहे.

२१. जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे, राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील तथा रुग्णसेवेशी संबंधित पदांसाठी (उदा. परिचारिका, तंत्रज्ञ, अधिपरिचारिका, समुपेदशक) वयोमर्यादा ६५ वर्षे राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरिता कमाल सेवाप्रवेश मर्यादा ०५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल. ६०

Scanned with CamScanner

वर्षावरिल अर्जदारांकरिता जिल्हा शल्यचिकित्सक प्रमाणित शारिरीक योग्यता चे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

२२. विहीत पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज, विहित नमुन्यात नसलेले किंवा योग्य प्रकारे न केलेले अर्ज, मजकुर अपुर्ण किंवा चुकीचा भरलेला अर्ज, खाडाखोड केलेला अर्ज, स्वाक्षरी नसलेले, आवश्यक गुणपत्रकांच्या व प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती नसलेले अर्ज अगर तत्सम माहिती योग्य रित्या न दर्शविलेले अर्ज, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र अपूर्ण भरलेले व न जोडलेले अर्ज इत्यादी प्रकारे सादर केलेल्या अर्जदारांना अपात्र ठरविण्यात येईल याची अर्जदारांनी नोंद घ्यावी.

२३. उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्येच अर्ज सादर करावेत. खाली नमुद आवश्यक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

- विहीत नमुन्यातील अर्ज (सदर अर्जाचा नमुना जाहिराती सोबत संकेत स्थळावर उपलब्ध असेल)
- शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्रे व गुणपत्रिका (१०वी, १२वी, पदवी, पदव्युत्तर या शैक्षणिक अर्हतेच्या सर्व वर्षे व सर्व सत्रांच्या गुणपत्रिका)
- शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला
- NHM, शासकिय संस्था, विभाग, शासन अंगिकृत संस्थेतील अनुभवाचा दाखला तसेच COVID अंतर्गत शासकिय आरोग्य संस्थेतील विहित पदासाठी काम केलेल्या अनुभवाचा दाखला असल्यास प्राधान्य दिले जाईल. तसेच विनावेतन, अर्धवेळ, प्रशिक्षण कालावधी, ॲड-हॉक (Ad-hoc), अंतरवासिता (Internship) चा अनुभव ग्राहय धरला जाणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.
- जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र
- संबंधित पदाकरिता तत्सम कौन्सिलचे महाराष्ट्र राज्याचे नोंदणी प्रमाणपत्र (पर्मनंट), नोंदणीचे नुतनीकरण व कौन्सिलचे आयकार्ड
- पासपोर्ट आकाराचे २ फोटो
- उमेदवाराच्या नावांत बदल झाला असल्यास शासनाचे राजपत्र
- आधारकार्ड
- पॅनकार्ड
- लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

सदर पदभरती प्रक्रियेसाठी इच्छूक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रतीसह आपले अर्ज दि. ०८/०८/२०२४ ते दि.२०/०८/२०२४ (कार्यालयीन दिवशी) या कालावधीमध्ये सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.३० या वेळेमध्ये राष्ट्रीय

Scanned with CamScanner

आरोग्य अभियान कार्यालय (जिल्हा आरोग्य अधिकारीस्तर), दुसरा मजला, जिल्हा रुग्णालय अलिबाग, पिन कोड - ४०२२०१ या कार्यालयामध्ये प्रत्यक्ष अथवा पोस्टाने सादर करावेत.

दि. २०/०८/२०२४ रोजी सायंकाळी ५.३० नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही तसेच ईमेलव्दारे प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. याशिवाय सोबत जोडलेल्या नमुन्यातील पूर्णपणे भरलेला अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रे व नमुन्यामध्ये जोडलेली कागदपत्रांची यादी (चेकलिस्ट) अशा परिपूर्ण कागदपत्रांसह उमेदवारांनी अर्ज सादर करणे बंधनकारक राहील. तसेच विहित मुदतीनंतर टपाल / कुरियर वा इतर कोणत्याही कारणामुळे उशिरा प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

*२४. रायगड जिल्हयासाठी **Block Public Health Unit (BPHU)** करिता मंजुर सर्व आरोग्य संस्थासाठी सदरील पदभरती प्रक्रिया राबवून राज्यस्तरीय मार्गदर्शक सुचनांनुसार ७० टक्के काम पूर्ण झालेनंतर अटी व शर्तीनुसार निवड झालेल्या प्रथम टप्प्यात प्रतिक्षा यादीवर ठेवून तद्नंतर सदरील उमेदवारांना आवश्यकतेनुसार अटी व शर्तीनुसार नियुक्ती आदेश देण्यात येतील. सदयस्थितीत रायगड जिल्हयासाठी **Block Public Health Unit (BPHU)** करिता राज्यस्तरावरुन मंजुरी मिळालेनुसार ९ संस्था अंतिम झाल्या असुन १ संस्था अद्यापही निश्चित झाली नसल्याने सदर संस्था निश्चित झालेनंतर निवड झालेल्या उमेदवारांस अटी व शर्तीनुसार नियुक्ती आदेश देण्यात येतील.

२५. सेवानिवृत्त शासकिय अधिकारी / कर्मचारी यांना मुळ वेतन (Basic Pay) + ग्रेड पे या दोन्ही रक्कमेची बेरीज वजा निवृत्ती वेतन यामधील फरकाची रक्कम मानधन म्हणून अनुज्ञेय राहील.

२६. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सेवानिवृत्त (कंत्राटी) अधिकारी / कर्मचाऱ्यांचे मानधन निश्चित करताना फरकाची रक्कम व प्रकल्प अंमलबजावणी आराखडयातील पदनिहाय मंजूर मानधनाची रक्कम किंवा पदाचे सदयस्थितीतील अनुज्ञेय मानधन यापैकी जी रक्कम कमी असेल ती देय राहील.

२७. याशिवाय नियुक्ती आदेश स्विकारताना उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक व इतर कागदपत्रांच्या पडताळणीकरिता मूळप्रती सादर करणे बंधनकारक राहील. मूळप्रती सादर न केल्यास सदर उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल याची नोंद घ्यावी.

**आदिवासी बहुल जिल्हयांसाठी आरक्षणाची पदे भरणेबाबत कार्यवाहीकरिता सुधारित सुचना प्राप्त नसल्याने रिक्त पदांचे संवर्गनिहाय विगतवारी दर्शविण्यात आलेली नाही. तथापि जाहिरातीमध्ये नमुद सर्व संवर्गातील इच्छुक उमेदवारांना अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात**

Scanned with CamScanner

येत आहे. बिंदूनामावलीबाबत सुधारित सुचना प्राप्त झालेनंतर त्यांचे अधिन राहुनच नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

दिनांक :-०७/०८/२०२४
ठिकाण :- अलिबाग

(डॉ.मनिषा विखे)
सदस्य सचिव, निवड समिती
तथा,
जिल्हा आरोग्य अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

(डॉ.भरत बास्टेवाड) भा.प्र.से.
अध्यक्ष,निवड समिती
तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

Scanned with CamScanner